Pc/4/E/yugendra/circular

# मुंबई विद्यापीठ

क्र. संलग्नता/आय.सी.सी./२०२३–२४/ ५५ /२०२४

## परिपत्रक:

**विषय: जल जागृती सप्ताहाबाबत.....**

संदर्भ:— १) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/मवि–१/जल जागृती/२०२४/१७३२ आणि १७२९, दिनांक १४ मार्च, २०२४.
२) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन/ संकीर्ण–२०२४/सं.क्र. ४१/समन्वय कक्ष, दिनांक १४ मार्च, २०२४.
३) उपसचिव (लाक्षेवि), महाराष्ट्र शासन यांचे सुचना पत्र क्र. संकीर्ण–२०२४(प्र.क्र.२३/२४)लाक्षेवि (आस्था), दिनांक १ मार्च, २०२४.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायमविनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक १६ ते २२ मार्च, २०२४ दरम्यान **'जल जागृती सप्ताह'** साजरा करण्यात येणार आहे. जलसंपदा विभागाच्या संदर्भांकिंत शासन निर्णयातील मुद्दा क्र. २.५ मध्ये उच्च शिक्षण विभागाकडून जल जागृती सप्ताह कशा प्रकारे साजरा करण्यात यावा याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व महाविद्यालयांनी संदर्भांकिंत शासन निर्णयातील सूचनांनुसारं कार्यक्रमांचे आयोजन करून दिनांक १६ ते २२ मार्च, २०२४ या कालावधीत **'जल जागृती सप्ताह'** साजरा करण्यात यावा, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठाकडे सादर करण्यात यावा. जेणेकरुन सर्व महाविद्यालयांचे अहवाल संकलित करुन संचालनालयास सादर करता येईल.

तरी सोबत जोडलेल्या पत्रानुसार महाविद्यालयांनी अंमलबजावणी करावी.

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

ठिकाण :— मुंबई–४०० ०३२
दिनांक:–१५ मार्च, २०२४

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.
Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in
फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.
क्र.: उशिसं/मवि-१/जल जागृती/२०२४/१७३२ दिनांक: १४.३.२०२४

## परिपत्रक

विषय: जल जागृती सप्ताहाबाबत..

वाचा- १. शासनपत्र क्र.: संकीर्ण- २०२४/सं क्र.४१/समन्वय कक्ष दि. १४.३.२०२४
२. जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र.: संकीर्ण-२०१६/ (प्र.क्र.०७/१६)/ लाक्षवि (आस्था) दि. ११.२.२०१६

संदर्भ पत्र क्र. २ ची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकनी घ्यावी.

महाराष्ट्र शासनातर्फे **दि. १६ ते २२ मार्च २०२४** दरम्यान **"जल जागृती सप्ताह"** साजरा करण्यात येणार आहे. जलसंपदा विभागाच्या संदर्भांकित शासन निर्णयातील मुद्दा क्र. २.५ मध्ये उच्च शिक्षण विभागाकडून जल जागृती सप्ताह कशा प्रकारे साजरा करण्यात यावा याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

उच्च शिक्षण विभागाच्या कार्यकक्षेतील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांनी संदर्भांकित शासन निर्णयातील सूचनांनूसार कार्यक्रमांचे आयोजन करुन दि. १६ ते २२ मार्च २०२४ या कालावधीत जल जागृती सप्ताह साजरा करण्याबाबत, आपल्या स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालयांना विनाविलंब सूचित करण्यात यावे.

सर्व संबंधित विद्यापीठांकडूनही जल जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात यावे.

केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास, शासनास तसेच जलसंपदा विभागास सादर करण्यात यावा.

विभागीय सहसंचालक कार्यालयांनी त्यांच्या कार्यकक्षेतील सर्व महाविद्यालयांचा अहवाल आपल्या स्तरावर संकलित करुन एकत्रित स्वरुपात सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग ,मंत्रालय विस्तार,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-
४०० ०३२

Email ID:- do.asthahte-mh@ gov.in
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१

दिनांक-१४.०३.२०२४.

क्रमांक:- संकीर्ण-२०२४/सं.क्र.४१/समन्वय कक्ष

प्रति,

संचालक,(उच्च शिक्षण) उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे.

संचालक,(कला) संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक,(तंत्र शिक्षण) तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई

विषय:- जल जागृती सप्ताहाबाबत सूचना देणेबाबत....

संदर्भ :- १. जलसंपदा विभागाचे संकीर्ण २०२४(प्र.क्र. २३/२४)/लाक्षेवि(आस्था) दिनांक ०१/०३/२०२४ रोजीचे पत्र.

२.जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/(प्र.क्र.०७/१६) लाक्षेवि(आस्था) दिनांक ११.०२.२०१६.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन करावे.

२. सदरच्या पत्रामध्ये महाराष्ट्र शासनतर्फे दि.१६ ते २२ मार्च २०२४ या दरम्यान "जलजागृती सप्ताह" साजरा करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जलसंपदा विभागाचा दिनांक ११.०२.२०१६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. १६.०३.२०२४ ते २२.०३.२०२४ या दरम्यान "जलजागृती सप्ताह" साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला

(श्री. विशाल ताठे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

सोबत : वरिलप्रमाणे

प्रत,

निवडनस्ती (समन्वय कक्ष).

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग, नविन प्रशासकीय भवन, १० वा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

Email: docadw@maharashtra.gov.in

अत्यंत तातडीचे/ईमेलद्वारे

दिनांक: ०१/०३/२०२४

क्र.संकीर्ण-२०२४/(प्र.क्र.२३/२४)/लाक्षेवि (आस्था)

प्रति,

१) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
३) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव, उदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

**विषय** : जलजागृती सप्ताहाबाबत सूचना देण्याबाबत.

**संदर्भ** : शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१६/(प्र.क्र.०७/१६) लाक्षेवि (आस्था), दि. ११/०२/२०१६.

महोदय,

कृपया संदर्भाधीन शासन निर्णयाचे अवलोकन व्हावे. आंतराष्ट्रीय स्तरावर २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन "Water for Peace" विषयाच्या अनुषंगाने साजरा केला जाणार असून महाराष्ट्र शासनही दि. १६ ते २२ मार्च, २०२४ या कालावधीत "जलजागृती सप्ताह" साजरा करणार आहे. त्या अनुषंगाने दि. १६ ते २२ मार्च, २०२४ या दरम्यान "जलजागृती सप्ताह" साजरा करण्याबाबत आपल्या विभागातर्फे कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन संबंधितांना देण्यात याव्यात तसेच सप्ताह साजरा झाल्यानंतर याबाबत झालेल्या एकंदरीत कार्यवाहीबाबत या विभागास अवगत करावे, ही विनंती.

आपला,

(म. गु. वानखेडे)
उपसचिव (लाक्षेवि), महाराष्ट्र शासन

प्रत,

निवडनस्ती/लाक्षेवि (आस्था)

२२ मार्च या जागतिक जलदिनानिमित्त
जल जागृती सप्ताह साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/(प्र.क्र.०७/१६) लाक्षेवि (आस्था)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ११ फेब्रुवारी, २०१६

प्रस्तावना

सजीवांच्या अस्तित्वासाठी पुरेशा स्वच्छ पाण्याची उपलब्धता न झाल्यास त्याचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. गेल्या काही काळात नैसर्गिक बदलामुळे पावसाचे प्रमाण व वेळा अनिश्चित झाल्याने पाण्याचे नियोजन करणे अडचणीचे झाले आहे. राज्यात गेल्या काही वर्षात निर्माण होणाऱ्या सततच्या अवर्षण परिस्थितीमुळे पाणी टंचाईमुळे पाणी टंचाईचे संकट वाढत आहे.

राज्यातील सिंचन व बिगर सिंचनाचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न शासनामार्फत केले जात आहेत. मात्र पाणी टंचाईचे प्रश्न सोडविण्यासाठी जनतेचा सक्रिय सहभाग व सहकार्य मिळाल्या शिवाय पाण्याचे प्रश्न संपणार नाहीत. त्यासाठी पाण्याची उपलब्धता व पाणी वापराचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचा गरजेपुरता वापर करणे, नैसर्गिक जलस्त्रोत, नदया व जलाशयाचे प्रदुषण रोखणे, पायाभूत सुविधाचे संरक्षण करणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करणे याबाबत समाजात जागृती व साक्षरता निर्माण होण्याची गरज आहे. त्यासाठी सतत विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे निदर्शनास आले आहे.

२२ मार्च हा दिवस " जागतिक जलदिन" म्हणून साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून प्रतिवर्षी दि. १६ ते २२ मार्च हा सप्ताह संपूर्ण राज्यात "जल जागृती सप्ताह" म्हणून साजरा करण्याचे नियोजित आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :-

१.० राज्यात सर्वत्र प्रतिवर्षी दि.१६ ते २२ मार्च या कालावधीत "जल जागृती सप्ताह" साजरा करावा. जल जागृती सप्ताहमध्ये राज्यस्तरावर, विभागस्तरावर, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयामार्फत जलजागृती उपक्रम राबवावेत.

२.० जल जागृती सप्ताहमध्ये राज्यातील पाण्याशी संबंधित प्रशासकीय विभागमार्फत खालीलप्रमाणे उपक्रम राबवावेत.

२.१ जलसंपदा विभाग

सिंचनासाठी पाणी वापरासंबंधित कायदे व नियमाबाबत लाभधाराकांमध्ये जागृती निर्माण करणे, सिंचन प्रकल्पाची रचना, धरण व कालव्याचे सरंक्षण करण्याची गरज, कालवा फुटीच्यावेळी घ्यावयाची दक्षता, सिंचन व्यवस्थापनाच्या शिस्तीचे पालन करणे, पाणी वापर संस्थाचे महत्व व त्याचे फायदे पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता, सुक्ष्म सिंचन पध्दती अमलात आणण्याची गरज, भूजल व कालव्याच्या पाण्याचा संयुक्त वापराचे नियोजन, को.प. बंधाऱ्यांचे सिंचन व्यवस्थापन, बंधाऱ्यात दरवाजे बसविणे व काढण्याचे तंत्र इत्यादीबाबत समाजात जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागामार्फत विविध उपक्रम राबवावेत. त्यासाठी जिल्हापातळीवर, तालुका पातळीवर, गाव पातळीवर लोकप्रतिनिधी व लाभधारकांचे

मेळावे / चर्चा / व्याख्याने आयोजित करावीत. जिल्हापातळीवर अधिक्षक अभियंता, तालुका पातळीवर कार्यकारी अभियंता यांनी, जिल्हापरिषद मतदार संघामध्ये उप अभियंता व गावपातळीवर शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता यांनी विविध कार्यक्रमाचे नियोजन करावे, मुख्य अभियंत्यांनी वरीलप्रमाणे कार्यक्रमाचे सविस्तर नियोजन करुन त्याचे सनियत्रंण करावे.

लाभक्षेत्रातील रस्त्याच्याकडेने दर्शनी भागात भिंतीवर ठळक अक्षरात घोषवाक्ये, माहिती गडद रंगाने लिहावी. शाळा व कॉलेजच्या आवारात, ग्रामपंचायात कार्यालये, तलाठी कार्यालये या ठिकाणी भिंतीफलके लावावीत.

धरण व कालव्यांवर शेतकऱ्यांच्या सहली आयोजित करुन त्यांना प्रकल्पाबाबत माहिती दयावी, ज्या प्रकल्पांच्या चित्रफिती केल्या असतील त्या दूरदर्शनवर प्रसारित कराव्यात. स्थानिक वृत्तपत्रामध्ये लेख प्रसिध्द करावेत. माध्यमांना मुलाखती देऊन जल जागृतीसप्ताहाचे महत्व विषद करावे. जल जागृती सप्ताहाचा उपक्रम मधून पुढील वर्षी उपलब्ध पाण्यातून किमान १० % सिंचन क्षेत्र वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवावे.

## २.२ कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग.

पारंपारिक प्रवाही सिंचनामध्ये पाण्याची बचत करण्याचे उपाय, सुक्ष्म सिंचन पध्दतीचे फायदे, उपलब्ध पाण्यामध्ये घ्यावयाची विविध पिके, पिकांसाठी पाण्याची नेमकी गरज व त्याच्या वेळा, निर्मित सिचंन क्षमतेचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांच्या स्थानिक अडचणीबाबत मार्गदर्शन, शासनाच्या विविध उपक्रमाची माहिती देणे, इत्यादी उपक्रम राबवावेत. त्यासाठी जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर विविध चर्चासत्रे, बैठका, व्याख्याने, मेळावे आयोजित करावे. त्यामध्ये सिंचनाच्या पाण्याची बचत व सुक्ष्मसिंचन पध्दतीचा प्रसार हे मुद्दे असावेत

विभागीय पातळीवर कृषी आयुक्तामार्फत, जिल्हा पातळीवर जिल्हा कृषी अधिकारी, तालुका पातळीवर तालुका कृषी अधिकाऱ्यांमार्फत कार्यक्रमाचे व गावपातळीवर कृषी सहायकामार्फत कार्यक्रमाचे आयोजन केले जावे.

वरील उपक्रम राबविण्यासाठी रस्त्याच्याकडेने घोषवाक्ये लिहिणे, प्रसार माध्यमातून मुलाखती देणे, वृत्तपत्रातून लेखे प्रसिध्द करणे, ग्रामपंचायती, तलाठी कार्यालये, शाळा महाविद्यालयाच्या आवारात माहिती दर्शक भिंतीफलके लावणे इत्यादी कार्यक्रम राबविणे.

## २.३ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग / नगर विकास विभाग

नागरी भागात घरगुती पाणी वापरात बचतीचे उपाय, पाण्याचा अपव्यय टाळणे, वितरण व्यवस्थेमधील पाणी नाश टाळण्यासाठीचे उपाय याबाबत जागृती निर्माण करण्याचे उपक्रम राबवावेत, ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांचा उद्भव व तेथील यंत्रणा कार्यक्षम ठेवण्यासाठी घ्यावयाची काळजी, टंचाई भागात पाणी पुरवठयाची व्यवस्था, उपलब्ध पाण्याच्या काटकसरीने वापर, उद्भवाचे मजबुतीकरण करणेचे उपाय याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने उपक्रम राबवावेत.

अवर्षण परिस्थितीमध्ये घरगुती वापरासाठी उपलब्ध असलेले पाणी दिर्घ काळ टिकून राहण्याच्या दृष्टीने जागृती निर्माण करणे, त्यादृष्टीने गांवामध्ये, शहरांमध्ये, प्रत्येक वार्डातील लोकांशी थेट संपर्क करुन त्यांच्यात जागृती निर्माण करावी, त्यासाठी गल्लोगल्ली व गृहनिर्माण संस्थामध्ये चर्चासत्रे / व्याख्याने आयोजित करावीत. रस्त्यांच्याकडेने दर्शनी भागात पाणी बचतीचे व स्वच्छतेबाबत घोषवाक्ये व माहिती ठळकपणे लिहावी. शहरी हद्दीत बांधकाम, उद्याने व स्वच्छतेसाठी भूजलाचा वापर करणे, शहर हद्दीतील नाले व नदयांचे प्रदुषण रोखणे, पावसाळयात पाण्याचे संवर्धन इत्यादी उपाययोजनेचे महत्व स्पष्ट करावे, मिटरद्वारा पाणी पुरवठा हा पाणी बचतीचा अंतिम उपाय आहे. त्याबाबतचे फायदे व गरज याबद्दल जागृती निर्माण करावी.

जिल्हा व तालुका मुख्यालयी, मोठी गावे या ठिकाणी सर्वत्र उपक्रम राबवावे. महानगर पालिकेचे आयुक्त व नगर पालिकांचे मुख्याधिकारी यांचेवर शहर हद्दीत जल जागृती सप्ताह मध्ये विविध कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी राहील. प्रादेशिक नळ पाणी पुरवठा व ग्रामीण नळ पाणी पुरवठा या बद्दल गाव स्तरावर जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपक्रम राबवावेत. याउपक्रमाद्वारे पुढील वर्षी घरगूती पाणी वापरांत किमान १० % पाणी बचतीचे उद्दिष्ट ठेवावे.

**२.४ पर्यावरण विभाग, उद्योग विभाग**

सध्या घरगुती व उद्योगासाठी पाण्याचा जेवढा वापर होतो त्यापेक्षा जास्त पाण्याचा नाश सांडपाणी नैसर्गिक प्रवाहात मिसळल्याने होणाऱ्या प्रदुषणामुळे होतो असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नैसर्गिक प्रवाहाचे प्रदुषण रोखणे हे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

शासन पातळीवरुन याबाबत विविध उपाय योजिले गेले आहेत. तथापि स्थानिक लोकांनी या कार्यात सक्रिय सहभाग घेतल्यास निश्चितपणे प्रदूषण कमी होऊन नैसर्गिक प्रवाह स्वच्छ राहू शकतील. त्यादृष्टीने पर्यावरण विभागामार्फत लोकजागृतीचे उपक्रम राबवावेत. त्यासाठी शहर हद्दितील नदी नाल्याच्याकडेने स्थानिक लोकांच्या दिंडया आयोजित करणे, प्रदुषणाच्या उद्भवास भेट देणे, तेथील उद्योगपतीना समुहाने भेटणे,दुषीत पाणी नैसर्गिक प्रवाहात सोडल्याने होणाऱ्या दुष्परिणामाची कल्पना उद्योगपतीना / व्यवस्थापनास देणे, यांच्याकडून प्रदुषण न करण्याची लेखी हमी घेणे, लेखी हमी नुसार प्रदुषण कमी करणाऱ्या व्यवस्थापनाची /उद्योगपतीचे जाहिर अभिनंदन करणे, प्रदुषण करणाऱ्यांना पुन्हा विनंती करणे, त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणे, जनशक्तीचा दबाव निर्माण करुन तो टिकवून ठेवणे, प्रदुषन नियत्रंणाबाबत स्वयंसेवीसंस्थेचे पथक करणे, इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत.

प्रसार माध्यमातून लेख लिहिणे, दुरदर्शनवरुन चर्चाचे आयोजन करणे, रस्त्याच्याकडेने घोषवाक्य लिहिणे, गृहनिर्माण संस्था, कारखाने / उद्योगांच्या आवारात भिंती फलके लावणे, इत्यादी उपक्रम राबवावेत. महानगर पालिका, नगर पालिका, शहरे यामधील नैसर्गिक प्रवाहाचे प्रदुषण रोखण्याची जबाबदारी संबंधित प्रशासन प्रमुखावर राहील. कारखाने व उद्योगामार्फत होणारे प्रदुषण रोखण्यासाठीची जबाबदारी उद्योग विभागावर राहील, त्यादृष्टीने त्यांनी क्षेत्रिय स्तरावर कार्यक्रमाचे नियोजन करावे.

## २.५ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शिक्षणाच्या माध्यमातून भावी पिढी निर्माण होत असते. जलसप्ताहच्या कार्यक्रमाच्या आयोजनातून सर्व स्तरातील विद्यार्थ्यामध्ये पाण्याचे महत्व, पाण्याचे संवर्धन, प्रदुषण, पाण्याची गुणवत्ता या विषयी जागृती निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी शालेय स्तरावर याविषयी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्याख्याने, वकृत्व स्पर्धा, शालेय सहली, प्रदर्शन या माध्यमातून जागृती करावी. जलदिंडी च्या माध्यमातून नदी, जलशुध्दीकरण प्रकल्प या ठिकाणी भेटी आयोजित कराव्यात. सप्ताहाचे दरम्यान सकाळी प्राथनेचे वेळी जलप्रतिज्ञा द्यावी.

महाविद्यालयामध्ये वकृत्व स्पर्धा, व्याख्याने, जलसाहित्य संम्मेलन, प्रदर्शन, जलसंपदा प्रकल्पांना, जलशुध्दीकरण प्रकल्पास भेटी देणे असे उपक्रम राबवावेत. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रदुषीत पाण्यामुळे होणाऱ्या आजाराची माहिती द्यावी.

## २.६ ग्रामविकास व जलसंधारण विभाग

ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकांपर्यंत जलयुक्त शिवार व जल साक्षरता उपक्रम पोहचविण्यासाठी उपक्रम हाती घ्यावेत. त्यासाठी जिल्हापरिषदेमार्फत तालुकास्तरावर व गाव पातळीवर कार्यक्रम घ्यावेत. जिल्हापरिषदेच्या सर्व शाळांमध्ये वरीलप्रमाणे उपक्रम राबवावेत. विहीर पुर्न:भरण, विधंन विहीर पुर्न:भरण यांची प्रात्यक्षीके ग्राम पातळीवर आयोजित करावी. जलसंधारणची कामे, जलयुक्त शिवार प्रकल्पांना भेटी देणे व शिवार फेरी, या सारख्या कार्यक्रमाचे आयोजन करावे. गावातील बसस्थानक, चावडी, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा या सार्वजनिक ठिकाणी घोषवाक्ये व भिंतीफलक लावावेत. प्रत्येक गावाच्या पाण्याचा जललेखा तयार करुन त्याचे वाचन करावे. त्याची माहिती नागरीकांना द्यावी. गावाचा जललेखा ही संकल्पना जनतेत रुजवावी.

## २.७ माहिती व जनसंपर्क विभाग

जल जागृती सप्ताहमध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमांना दुरवर प्रसिध्दी देण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, जल जागृती प्रभावी होण्यासाठी परिणामकारकर चित्रफीती, जाहीराती तयार करुन त्या दूरदर्शन व आकाशवाणीवरुन या सप्ताहमध्ये प्रसारित कराव्यात. या सप्ताहमध्ये पहिल्या दिवशी दि.१६.०३.१६ रोजी मा. मुख्यमंत्री व इतर दिवशी दररोज एका विभागाच्या मंत्र्याची मुलाखत / संदेश दूरदर्शन वरुन प्रसारीत करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.

३.० जल जागृती सप्ताहाचा शुभारंभ मा. मुख्यमंत्री महोदयांच्या संदेशाने होईल. त्याच वेळी जिल्हा स्तरावर सप्ताहाचा शुभारंभ करण्यात यावा. शुभारंभाचे वेळी जलप्रतिज्ञेचे सामूहिक वाचन करावे. कार्यक्रमास जिल्हास्तरांवरील लोकप्रतिनिधी, महानगर पालिकेचे पदधिकारी , प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सहभाग घ्यावा. जल जागृती सप्ताहाचा समारोप दि.२२ मार्च या दिवशी जागतिक जलदिनी पालकमत्र्यांच्या संबोधनाने होईल. शुभारंभ व समारोपाच्या कार्यक्रमाचे आयोजन जलसंपदा विभागने करावे. महानगरपालिका व नगर पालिका, नगर परिषद स्तरावर शुभारंभ व समारोप कार्यक्रमाचे आयोजन महापौर / नगराध्यक्ष/सरपंच यांचे संबोधनाने स्वतंत्रपणे करावे.

४.० वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शनानुसार जल जागृती सप्ताहाचे आयोजन करण्याबाबत संबंधित विभागाच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांनी दि.१५.०२.२०१६ पर्यंत सविस्तर परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करुन सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.

५.० प्रत्येक जिल्हयामध्ये विविध विभागामार्फत वरील सूचनेप्रमाणे जल जागृती सप्ताह राबविण्यासाठी समन्वयाचे काम जिल्हाधिकाऱ्यांनी करावे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्हयातील सर्व संबंधित विभाग, नागरीकांचे प्रतिनिधी, तज्ञ व्यक्ती व प्रसार माध्यमाचा समावेश असणारी समिती स्थापन करावी. समिती मार्फत सप्ताहातील कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करावी.

प्रत्येक महसूल विभागात जल जागृती सप्ताहमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एका जिल्हयाची निवड महसूल आयुक्त यांनी करुन शासनास शिफारस करावी. शासन स्तरावरुन राज्यातील तीन जिल्हयांचा यथोचित गौरव महाराष्ट्र दिनी करण्यात यावा.

६.० जल जागृती सप्ताह साजरा करण्यासाठी येणारा खर्च संबंधित विभागांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या अनुदानातून करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२१११७३२०६८३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Samadhan Kondiba Sabbinwar

Digitally signed by Samadhan Kondiba Sabbinwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Superintendent Engineer And Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Samadhan Kondiba Sabbinwar
Date: 2016.02.12 12:34:32 +05'30'

(स.कों.सब्बीनवार)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३. मा.मंत्री, जलसंपदा विभाग, यांचे खाजगी सचिव
४ अ.मु.स. (कृषी), कृषी व पशुसंवर्धन विभाग, यांचे स्वीय सहायक
५. अ.मु.स. (पर्यावरण), पर्यावरण विभाग, यांचे स्वीय सहायक
६. मा.प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक
७. मा.प्रधान सचिव (उद्योग), उद्योग व व कामगार विभाग, यांचे स्वीय सहायक
८. मा प्रधान सचिव (नगर विकास विभाग) यांचे स्वीय सहायक
९. मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक
१०. मा. प्रधान सचवि (उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहायक
११. मा.प्रधान सचिव (ग्राम विकास व जलसंधारण विभाग) यांचे स्वीय सहायक

१२. मा.सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहायक
१३. मा.सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक
१४. महासंचालक (मावज) माहिती व जनसंपर्क संचालनालय, यांचे स्वीय सहायक
१५. सचिव जलसंधारण विभाग, मंत्रालय,
१६ .सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग
१७. महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, (वाल्मी) औरंगाबाद
१८. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा) नाशिक
१९. महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. सर्व आयुक्त, महानगर पालिका,
२२. सर्व मुख्य अभियंता , जलसंपदा विभाग
२३. सर्व जिल्हाधिकारी
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
२२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद
२३. सर्व सह सचिव / उप सचिव / जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबुई
२४ उप सचिव (कृषी विभाग / पर्यावरण विभाग, नगर विकास विभाग/ उद्योग/पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग/)
२५. महासंचालक (मावज) माहिती व जनसंपर्क संचालनालय, यांचे स्वीय सहायक
२६. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
२७. सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग
२८. अवर सचिव/ कक्ष अधिकारी / जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. निवड नस्ती.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail:director.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-उशिसं/युनिसेफ/२०२४/ १७२९ दि. 14 MAR 2024

**ईमेलद्वारे**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य
कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

विषय: जागतिक जल दिन (२२ मार्च) उपक्रम महाविद्यालय स्तरावर साजरा करणेबाबत सुधारित परिपत्रक आणि मुदतवाढ

संदर्भ: संचालनालयचे पत्र क्रमांक संकीर्ण २०२२/ प्र.क्र.१२९/विशी-५ दिनांक १३/०१/२०२३
महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचे पत्र क्र. उशिसं/युनिसेफ २०२३/७३२४ दि.२०.०६.२०२३
महाराष्ट्र शासन, शिक्षण c (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचे पत्र क्र.उशिसं/२०२३/७३१५ दि. २०.०६.२०२३
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या जागतिक जलदिन साजरा करण्याबाबतच्या दिनांक ३१ जानेवारी २०२४ रोजीच्या सूचना.
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांचे जागतिक जल दिन (२२ मार्च) उपक्रम महाविद्यालय स्तरावर साजरा करणेबाबत पत्र क्र.उशिसं/UNICEF/मवि-१/२०२४/९७७ दि. १२.०२.२०२४

महोदय,

संदर्भीय विषयानुसार, महाराष्ट्र शासन राज्यातील १३ जिल्ह्यांतील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त महाविद्यालयांमध्ये **'युवकांच्या(youth students) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचत'** हे अभियान राबविले जात आहे. संदर्भ क्रमांक २आणि ३ नुसार राज्यातील सर्व जिल्ह्यातील महाविद्यालयांत ऑनलाईन सेल्फ पेस्ड (स्वयंगती) कोर्सची(https://www.mahayouthnet.in/) अंमलबजावणी सुरू आहे. त्याचप्रमाणे, संदर्भ क्रमांक १ नुसार निवडक तेरा (१३) जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक संसाधने व पाण्याची बचत या अभियानांतर्गत सर्व महाविद्यालयांत ग्रीन क्लब स्थापन करवून विविधउपक्रम राबविले जात आहेत.. पाणीबचतीच्या उपाययोजनांसाठी ग्रीन क्लब च्या माध्यमातून सात सहज करण्याजोग्या कृतीयोजना राबविणे अपेक्षित आहे. यामध्ये गळक्या नळांची दुरुस्ती, शॉवर एवजी बादलीने पाणी वापरणे, दात घासताना किंवा दाढी करताना पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेणे, ग्रामीण भागात शोष खड्डे व पाझर खड्डे बनविण्यास प्रवृत्त करणे इत्यादी उपक्रम संबंधित महाविद्यालयातील ग्रीन क्लबने करणे अपेक्षित आहे.

या अनुषंगाने राज्यातील सर्व महाविद्यालयांत **जागतिक जल दिन** साजरा करण्याचे सूचित करण्यात येत आहे. जागतिक जलदिनाच्या निमित उपक्रमांची यशस्वी उपक्रम राबविल्याबाबत प्रोत्साहनपर पुरस्कार संदर्भातील निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकातील ग्रीन क्लब यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यासंदर्भात आयोजित स्पर्धेत खालील प्रमाणे काही बदल करण्यात येत आहेत

**ग्रीन क्लबने खालील प्रमाणे उपक्रम राबवावे. यासाठीच्या मार्गदर्शक सूचना व पुरस्कारासाठी निवडीचे सुधारित निकष खालील प्रमाणे देण्यात आहेत.**

| | | |
|---|---|---|
| रिल/शॉर्टव्हिडीओ | जागतिक जल दिन आणि पाणी बचतीच्या व्यक्तिगत सवयीमध्ये बदल या विषयावर सबंधित महाविद्यालयातील ग्रीन क्लबच्या माध्यमातून एक रिल/शॉर्ट व्हिडीओ बनवणे.<br>१ मराठी, हिंदी व इंग्रजी इत्यादी भाषेचा वापर करता येईल.<br>२ वेळ मर्यादा:- रिल/शॉर्ट व्हिडीओ दोन(२)मिनिट पेक्षा जास्त वेळाचा नसावा.<br>३ ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांनी ऑनलाईन गूगल फॉर्मच्या माध्यमातून आपल्या ग्रीन क्लबमधून एक रिल/शॉर्टव्हिडीओ पाठवावे. लिंक:- http://tinyurl.com/WWD-YEWS-Reels | १. ग्रीन क्लब फॅकल्टीकोऑर्डीनेटर यांच्या मार्फतप्राप्त रिल/शॉर्ट व्हिडीओ मूल्यांकन: जिल्हा नोडलअधिकारी व संबंधित डिट्रिक्टरिसर्चर हे प्राप्त रिल/शॉर्टव्हिडीओ पैकी निवड करून उत्कृष्ट तीन (३) रिल/शॉर्टव्हिडीओ राज्यस्तरीय निवडीस पाठवतील.<br>२. अभियानाशी सबंधित जिल्हा नोडल अधिकारी वसंबंधित डिट्रिक्ट रिसर्चर यांनी निवड करून पाठवलेल्या रिल/शॉर्ट व्हिडीओ मूल्यांकन राज्यस्तरावरील टीम मार्फत केले जाईल. जिल्हास्तरावर ३ तर राज्यस्तरावर ५ उत्कृष्ट रीलना पुरस्कार दिले जातील. |
| पाणी बचतीवर पोस्टर तयार करणे | जागतिक जल दिन आणि पाणी बचतीच्या व्यक्तिगत सवयीमध्ये बदल या विषयावर पोस्टर बनवणे.<br>पोस्टर हस्तनिर्मित असावेत (डिजिटल पोस्टर स्वीकारले जाणार नाहीत)<br>१. पोस्टरचा आकार A3 असावा<br>२. मराठी, हिंदी व इंग्रजी इत्यादी भाषेचा वापर करता येईल (पोस्टरमध्ये जास्तीत जास्त चित्रांचा वापर असावा, मजकूर कमीतकमी असावा.)<br>३. ग्रीन क्लब मधील सदस्य यांना सहभाग घेता येईल.<br>४. ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांनी आपल्या महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करावे.<br>५. ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांनी ऑनलाईन गूगल फॉर्मच्या माध्यमातून पोस्टरपाठवावे. लिंक: http://tinyurl.com/WWD-YEWS-Posters | ग्रीन क्लब फॅकल्टीकोऑर्डीनेटर यांनी आपल्यामहाविद्यालयात पोस्टर प्रदर्शनस्पर्धेचे आयोजन करुनपोस्टरचे मूल्यांकन करावे व त्यातील उत्कृष्ट तीन (३)पोस्टरची निवड करून जिल्हास्तरीय निवडीस पाठवावी.<br>२. ग्रीन क्लब फॅकल्टीकोऑर्डीनेटर यांच्या मार्फतप्राप्त पोस्टरचे मूल्यांकनजिल्हा नोडल अधिकारी वसंबंधित डिट्रिक्ट रिसर्चर करतील व निवड करून उत्कृष्ट तीन (३) पोस्टर राज्यस्तरीय निवडीस पाठवतील<br>३. अभियानाशी सबंधित जिल्हा नोडल अधिकारी वसंबंधित डिट्रिक्ट रिसर्चर यांनी निवड करून पाठवलेल्या पोस्टरचे मूल्यांकन राज्यस्तरावरील टीम मार्फत केले जाईल.<br>जिल्हास्तरावर ३ तर राज्यस्तरावर ५ उत्कृष्ट पोस्टरना पुरस्कार दिले जातील. |
| दात घासताना किंवा दाढी करताना पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेणे, ग्रामीण भागात शोष | युवकांच्या (youth students) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचत' अभियानात पाणी बचतीच्या सात सहज करण्याजोग्या उपाययोजना बाबत वेळोवेळी प्रशिक्षण व संवाद साहित्य( https://tinyurl.com/YEWS-Resource-Material ) पुरविण्यात आले प्रमाणे खालील | प्रात्यक्षिक मध्ये सामील सामील झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या विद्यार्थ्यांनी आपले समुदाय, सोसायटी, कॉलोनी, गाव, इथे केलेली प्रात्यक्षिके |

| | | |
|---|---|---|
| खड्डे व पाझर खड्डे बनविण्यास **प्रवृत्त करणे बाबत प्रात्यक्षिक** | कृती करता येऊ शकते<br>पाणी बचतीच्या सातही उपाययोजना बाबत चर्चा घडवून आणावी चर्चेअंती प्रात्यक्षिक करणेबाबत कृती आराखडा तयार करण्यात यावा प्रत्येक उपाययोजना बाबत प्रात्यक्षिक करण्यात यावे. उपक्रमातील काही उपाययोजना बाबत प्रात्यक्षिक करण्यात साधनांची व संसाधन व्यक्तींची आवश्यकता असल्यास स्थानीक संसाधनांचा वापर करावा<br>वरील प्रात्यक्षिके आवश्यक ती काळजी घेऊन समुदायामध्ये प्रात्यक्षिके करणे | |
| ग्रीन क्लब अंतर्गत पाणी बचतीच्या अनुषंगाने राबवण्यात आलेल्या विविध स्पर्धा व कार्यक्रम. | | |
| गळक्या नळांचीदुरुस्ती करणे | कृतीद्वारे 'युवकांच्या (youth students) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याचीबचत' अभियानातील पाणी बचतीची नोंदघेण्यासोबतच महाविद्यालयातील 'पाणी पुरवठासाधनांची (पाण्याच्या टाक्या, नळ, पाईपलाईन, इत्यादी) सुनिश्चितता' करवून यावर्षीच्याजागतिक जल दिन संकल्पनेला साध्य करण्यासमदत होईल. यासाठी संबंधित महाविद्यालयांनी वग्रीन क्लबने आवश्यक कार्यवाही करावी.<br>उदाहरणासाठी मुद्दे /टप्पे खालील प्रमाणे<br>१. गळक्या नळांचा/टाक्यांचा शोध<br>२. गळक्या नळातून होणाऱ्या पाण्याच्या नुकसानीचा अभ्यास व नोंद<br>३. ग्रीन क्लब च्या माध्यमातून महाविद्यालय प्राचार्य व प्रशासन यासोबत गळक्या नळांची, टाकीची व इतर साधनांची दुरुस्ती करण्यासाठी चर्चा व प्रस्ताव<br>४. गळक्या नळांची दुरुस्ती करणे' सत्र आयोजितकरण्यात यावे.<br>५. प्रत्यक्षात दुरुस्ती | १. गळक्या नळांची, टाकीची व इतर साधनांची प्रत्यक्षात दुरुस्ती<br>२. गळक्या नळांच्या दुरुस्ती चा अहवाल<br>३. नळ दुरुस्तीच्या चर्चा आणि प्रत्यक्षात सामील झालेल्या विद्यार्थ्यांची |
| **ऑनलाईन सेल्फ पेस्ड (स्वयंगती) कोर्सबाबत पुरस्कार** | १. https://www.mahayouthnet.in/ या साईट वरून विद्यार्थ्यांनी कोर्स करावा<br>२. यासाठी महाविद्यालयात जागृतीपर उपक्रम राबवावे उदा. परिपत्रक, नोटीस, कोर्स बाबतचे साहित्य प्रसार<br>३. कोर्स पूर्ण केलेबाबत चा अहवाल :http://tinyurl.com/WWD-YLCA-Course-Status | १. महावियालयात असलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या व त्याप्रमाणात (% मध्ये) कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या<br>२. कोर्स पूर्ण केलेबाबत चा महाविद्यालयाचा अहवाल<br>ही स्पर्धा सर्व जिल्हयांसाठी खुली आहे |
| **उपक्रम/स्पर्धेचा प्रकार** | **तपशील** | **निवडीचे निकष** |
| उत्कृष्ट ग्रिन क्लब | व्हाय वेस्ट वाय ई डब्लू एस ॲप वरील विद्यार्थी नोंदणी व दैनंदिनवापर२. ग्रीन क्लब अंतर्गत पाणी बचतीच्या अनुषंगाने राबवण्यात आलेल्या विविध स्पर्धा व कार्यक्रम<br>.<br>'युथ लीडरशिप फॉर क्लायमेट एक्शन' हाऑनलाईन सेल्फ-पेस्ड कोर्स पूर्ण करणे. | १. व्हाय वेस्ट वरील कॉलेजची रैंक (50% गुण)<br>२. ग्रीन क्लब अंतर्गतराबवण्यात आलेल्या विविध स्पर्धा व कार्यक्रम यांचेऑनलाईन गूगल फॉर्मच्या माध्यमातून पाठवलेले अहवाल (25% |

| | | |
|---|---|---|
| २. | आपले उपक्रम व कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची यादी आपल्याला पुढील लिंकद्वारे आमच्यापर्यंत पाठवता येईल https://tinyurl.com/YEWS-Green-Club-Action | गुण)<br>३. 'युथ लीडरशिप फॉरक्लायमेट एक्शन' हाऑनलाईन सेल्फ-पेस्ड कोर्सपूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची यादी (25% गुण)<br>जिल्हास्तरावर ३ तर राज्यस्तरावर ५ उत्कृष्ट ग्रीन क्लबना पुरस्कार दिले जातील. |

१. ग्रीन क्लबच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या कार्याबाबत अहवाल ऑनलाईन पद्धतीने सदर करण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च २०२४ ही होती परंतु सुधारित दिनांक २७ मार्च २०२४ असणार आहे.

२. जिल्हातरीय ग्रीन क्लब प्रोत्साहनपर पुरस्कार निवड जिल्हास्तरीय समिती मार्फत करण्यात येईल या समिती मध्ये सबंधित जिल्ह्याचे तीन सदस्य असतील.

| | |
|---|---|
| १ | जिल्हा नोडल अधिकारी उच्च शिक्षण |
| २ | जिल्हा नोडल अधिकारी तंत्रशिक्षण |
| ३ | जिल्हा समन्वयक/ रिसर्चर ( ACWADAM, CEE) |

३. राज्यस्तरीय ग्रीन क्लब प्रोत्साहनपर पुरस्कार निवड राज्यस्तरीय समिती मार्फत करण्यात येईल या समिती मध्ये पाच सदस्य असतील.

| | |
|---|---|
| १ | शिक्षण संचालक, उच्च शिक्षण तथा राज्य कार्यक्रम सचिवालय, अध्यक्ष (प्रोग्राम सेक्रेटरिएट) महाराष्ट्र राज्य, पुणे -१६ |
| २ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे तथा राज्य नोडल अधिकारी तंत्रशिक्षण |
| ३ | प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय तथा राज्य नोडल अधिकारी उच्च शिक्षण |
| ४ | प्रतिनिधी, युनिसेफ महाराष्ट्र, मुंबई |
| ५ | प्रतिनिधी, ॲडवान्सड सेंटर फॉर वॉटर रिसोर्सेस डेव्हलपमेंट ॲंड मॅनेजमेंट (ॲक्वाडॅम), पुणे |

याप्रमाणे काही बदल करण्यात आलेले आहेत. वरील प्रमाणे उपक्रम राबवून त्याबाबतचा सचित्र अहवाल https://tinyurl.com/YEWS-Green-Club-Action या लिंकद्वारे ग्रीन क्लबच्या आक्टिविटी रिपोर्ट लिंकद्वारे दि. २७.०३.२०२४ रोजी पर्यंत सादर करावा, विहित मुदती नंतर आलेल्याअहवालांचा ग्रीन क्लब प्रोत्साहनपर पुरस्काराच्या अंतिम निवड करण्यासाठी विचार करण्यात येणार नाही. वरील बाब आपल्या स्तरावरून अधिनस्त शासकीय/ अशासकीय महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

सोबत:- संदर्भ क्रमांक- ५ जोडले आहे.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण तथा
राज्य कार्यक्रम सचिवालय, अध्यक्ष (प्रोग्राम सेक्रेटरिएट)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१6

प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव

1. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई
2. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई
3. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई

4. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मुंबई
5. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
6. डॉ. दत्तात्रय जाधव, सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे तथा राज्य नोडल अधिकारी तंत्रशिक्षण
7. प्रशांत मगर, प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय तथा राज्य नोडल अधिकारी
8. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) तथा नोडल अधिकारी
9. मुख्य क्षेत्रीय अधिकारी (CFO), युनिसेफ महाराष्ट्र, मुंबई
10. उमा असलेकर, कार्यकारी संचालक, ॲडवान्सड सेंटर फॉर वॉटर रिसोर्सेस डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट (ॲक्वाडॅम), पुणे
11. अवधूत अभ्यंकर, प्रकल्प समन्वयक, 'युवकांच्या (Youth) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचतसंयुक्त अभियान'.
12. मधुकर लेंगरे, स्टेट लाइजनिंग ऑफिसर, 'युवकांच्या (Youth) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचतसंयुक्त अभियान'(YEWS)